# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासन स्वामित्व कंपनी)

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र.** २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९११८९ **फॅक्स:** २६५९०५८६

**ई-मेल:** spp_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:** www.sppl.biz


क्र. शिपुप्रम/वाहन निविदा/प्र.क्र.५३/२०१७ दिनांक:- ११ ऑक्टोबर, २०१७

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयास वाहने भाडेतत्वावर पुरविण्याकरीता ई-निविदा मागविणेबाबत.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयाकरीता खाली नमूद केलेल्या प्रकारची वाहने वाहनचालकासह ई-निविदेत नमूद अटी व शर्तींच्या अधीन मासिक कंत्राटी स्वरुपात भाडेतत्वावर ६ महिन्यांकरीता उपलब्ध करण्याकरीता इच्छुक पुरवठादाराकडून दि. २७ ऑक्टोबर,२०१७ (दुपारी ३.०० वा.) पर्यंत सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात ई-निविदा Mahatenders च्या वेबसाईटवर www.mahatenders.gov.in व्दारे मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अपेक्षित वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहनांची संख्या एकूण ३ | खाली नमूद केल्याप्रमाणे महिन्यातील एकूण किलोमीटर करीता वाहनचालकासह मासिक रक्कम नमूद करणे. | विनिर्दिष्ट किलोमीटर पुढील प्रती किलोमीटरकरीता दर नमूद करणे. | महिन्याच्या ३०० तासानंतरच्या अधिक तासाचा वाहनचालकाचा मोबदला म्हणून अतिकालीक भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | Honda City INNOVA AC | १ | शासकीय साप्ताहिक सुट्टया व सार्वजनिक **सुट्टयांसह महिन्याचे सर्व दिवशी** तसेच प्रत्येक महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहन उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १८०० किलोमीटर करीता मासिक एकूण ठोक रक्कम नमूद करावी. त्यानुसार दरमहा एकूण ठोक रक्कम रू.......... | महिन्यातील १८०० किमी पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर रु. . . . . .प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु...... प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| २. | कार AC इंजिन कॅपेसिटी (Engine Capacity) किमान १२०० CC | १ | शासकीय साप्ताहिक सुट्टया व सार्वजनिक सुट्टया **वगळून** महिन्यातील उर्वरीत दिवस विचारात घेऊन तसेच महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहन उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १२०० कि.मी.करीता मासिक एकूण ठोक रक्कम नमूद करावी. त्यानुसार रु. . . . . दरमहा. | महिन्यात १२०० किमी पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर - रु. . . . . . प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु. . . . . प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| ३. | कार AC इंजिन कॅपेसिटी साधारणपणे (Engine Capacity) ९९८ ते १५०० दरम्यानची. | १ | आठवडयातील **सर्व शनिवार व रविवार तसेच सार्वजनिक सुट्टया वगळून** महिन्यातील उर्वरीत दिवशी व महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहन उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १२०० कि.मी. करिता एकूण मासिक ठोक रक्कम नमूद करणे. त्यानुसार महिन्याची एकूण ठोक रक्कम रू................ | १२०० कि.मी. पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी रू.....प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु. . . . . प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| | **एकूण** | ३ | | | |

१. निविदा ऑनलाईन व विहीत नमुन्याच्या अर्जात भरुन Mahatenders च्या वेबसाईटवर www.mahatenders.gov.in व्दारे दि. २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावी.

२. प्राप्त ई-निविदा पुढील कार्यालयीन दिवशी दुपारी १.०० वाजता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे डाऊनलोड करण्यात येतील. सदर ई-निविदा उघडतेवेळी निविदाधारक स्वतः किंवा त्यांचा एक प्रतिनिधी प्राधिकृत पत्राच्या आधारे उपस्थित राहू शकतो.

३. केवळ www.mahatenders.gov.in व्दारे प्राप्त होणा-या ई-निविदा ग्राहय धरण्यात येतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती:**

१. वाहन उपलब्ध करणारा पुरवठादार अथवा एजन्सी हे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील असणे आवश्यक आहे.

२. भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचे कंत्राट आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून साधारणपणे ६ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील. सेवा आवश्यक तसेच समाधानकारक व व्यवहार्य आढळल्यासच पुढे जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत वाढविण्याचा विचार करण्यात येईल.

३. निविदा छाननी फी म्हणून रू २०००/- आणि बयाणा रक्कम म्हणून रू. १००००/- (रू दहा हजार फक्त) इतकी रक्कम प्रत्येकी ई-पेमेंट गेट-वे मार्फत जमा करावी लागेल. तसेच निवड होणा-या एजन्सीने सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) म्हणून ३ टक्के रक्कम शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडे धनादेशाव्दारे जमा करावी लागेल).

४. नियमान्वये विहीत करारनामा आठ दिवसाच्या आत करण्यात येईल. त्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

५. पुरविण्यात येणारी सर्व वाहने ही 'टी' परमिट जानेवारी २०१४ नंतरची असणे आवश्यक आहे. तसेच निविदा/दरपत्रक स्विकारण्यात आल्यास सर्व वाहनांची नोंदणी कागदपत्रे, आर.सी.बुक, टॅक्स बुक इ. तपशिल स्वयं साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक राहील.

६. निविदा/दरपत्रक स्विकारण्यात आल्यास भाडेतत्वावर पुरविण्यात येणाऱ्या वाहनांच्या वाहनचालकांच्या अनुज्ञप्तीसह सर्व तपशिल सादर करणे आवश्यक राहील.

७. वाहनचालकांसोबत त्याच्या वाहन चालविण्याच्या वैध परवाना असणे आवश्यक आहे.

८. उपलब्ध करुन देण्यात येणारा वाहनचालक भारतीय नागरीक असावा. तसेच त्यास मराठी लिहिता/वाचता/ बोलता येणे आवश्यक आहे. वाहनचालकास अनुज्ञप्ती प्राप्त केल्यानंतरचा मुंबईत वाहन चालविण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

९. वाहनचालकाचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

१०. सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा/ प्रवृत्तीचा नसावा.

११. वाहनास अपघात झाल्यास व दुर्दैवाने वाहन चालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्च अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कार्यालयाचे असणार नाही.

१२. सदर वाहनांच्या वापराबाबत लॉग बुक तयार करणे आवश्यक राहील. सदर लॉग बुकमधील सर्व नोंदी व वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावासहीत स्वाक्षरी त्या-त्या वेळी घेणे आवश्यक राहील. या लॉगबुकच्या दोन प्रती लेखा अधिकारी/शिपुप्रम यांच्याकडे महिना पूर्ण झाल्यावर ४ दिवसात सादर करणे आवश्यक राहील.

१३. पुरविण्यात येणा-या वाहनाचा वाहन क्रमांक वाहनचालकाचे नाव, संपर्क क्रमांक इत्यादी माहिती व्यवस्थापक (प्रशासन)/शिपुप्रम यांच्याकडे नियमितपणे देणे बंधनकारक राहील. काही कारणास्तव नेहमीचे वाहन बदलण्यात आले तरीही त्याच लॉग बुकमध्ये नवीन वाहनाचा क्रमांक व वाहन चालकाचे नाव यांच्या नोंदी करुन तसे शिपुप्रम कार्यालयास कळविणे आवश्यक राहील.

१४. वाहन वापराबाबत महिन्याच्या एकूण किमान ३०० तासाच्या पुढील वाहन वापराचा वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता मोजण्याकरीता विचार करण्यात येईल.

१५. वाहनांची किलोमीटर गणना प्रत्यक्ष वाहन वापर केल्याचे मोजण्यात येतील. केवळ रात्रीच्या वेळी अधिका-यांना निवासस्थानापर्यंत सोडावे लागल्यास परतीच्या प्रवासाचे मुंबईतील निवासस्थांनाच्या बाबतीत जास्तीत जास्त ८ किलोमीटर व मुंबईबाहेरील निवासस्थांनाच्या बाबतीत १५ कि. मी. जमेस धरण्यात येतील.

१६. एकदा ठरविण्यात आलेले दर हे आगामी ६ महिन्यांसाठी राहतील. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. सेवा आवश्यक तसेच समाधानकारक आढळल्यास व व्यवहार्य ती सेवा त्याच अटी व शर्ती व दरानुसार पुढील एक वर्षाकरीता चालू ठेवण्याचा विचार केला जाईल.

१७. त्याचप्रमाणे वाहन पुरवठादार एजन्सीकडून पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक न वाटल्यास एक महिन्याची पूर्वसूचना देऊन वाहन पुरवठादार एजन्सीसोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्याचे अधिकार कंपनीने राखून ठेवले आहेत.

१८. वाहने रोज स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. वाहन वापराच्या कालावधीत वाहनविषयी कराची रक्कम, विम्याची रक्कम, वाहनचालकाचे वेतन आणि भत्ते, वाहन दुरुस्ती खर्च, इंधन खर्च इ. सर्व खर्च कंत्राटदाराने स्वतः करावयाचा आहे. प्रत्यक्षात कार्यालयामार्फत कार्यालयीन वेळेत वाहन वापर करताना टोल शुल्क/ पार्किंग शुल्क कार्यालयामार्फत अदा केले जाईल.

१९. एखाद्या दिवशी वाहन उपलब्ध न झाल्यास, किंवा वाहन नादुरुस्त झाल्यास त्वरित पर्यायी वाहनांची सोय करुन देणे हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील, अन्यथा त्या दिवसाची अनुपस्थिती धरण्यात येईल. अनुपस्थितीच्या प्रत्येक दिवसाबद्दल रू. १०००/- प्रमाणे रक्कम वाहन पुरवठादार एजन्सीच्या देयकातून वसूल करण्यात येतील. तसेच उशिरा आल्यास प्रत्येक तासाबद्दल व त्यांच्या भागाबद्दल प्रत्येकी रू. १००/- वसूल करण्यात येतील. वाहनचालकाने संपर्कासाठी प्रतिसाद न दिल्यास प्रत्येक घटनेबद्दल अतिरिक्त रू. ५०/- वसूल करण्यात येतील.

२०. ज्या अधिकाऱ्यांसाठी वाहन सेवा पुरविण्यात येत आहे त्या अधिकाऱ्यांशी तसेच वाहनचालक यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून रोजच्या रिपोर्टिंगची वेळ व ठिकाण यांची खात्री करुन घेणे बंधनकारक राहील. याबाबत अधिकारी वर्गाकडून देखिल दक्षता घेण्यात येईल. ज्या अधिकाऱ्यांसाठी वाहन सेवा पुरविण्यात येत आहे, ते अधिकारी रजेवर असले तरीही संबंधित वाहनाबाबत व्यवस्थापक (प्रशासन) यांच्याकडे उपस्थिती कळविणे आवश्यक राहील.

२१. (१) उपरोक्त अपेक्षित ३ वाहनांपैकी क्र. १ येथील Honda City किंवा INNOVA हे एकमेव वाहन महिन्यातील सर्व दिवशी तसेच महिन्यातील एकूण किमान ३०० तास आवश्यक राहील, हे विचारात घेऊन त्या केवळ एक वाहनासाठी संपूर्ण महिन्याची ठोक रक्कम नमूद करावी. तसेच १८०० किलोमीटर पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर नमूद करावेत.

(२) क्र. २ येथील वाहन हे महिन्यातील शासकीय साप्ताहिक सुट्ट्या व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी आवश्यक असणार नाही, हे विचारात घेऊन प्रती महिना १२०० किलोमीटर करीता एकूण ठोक रक्कम नमूद करावी. तसेच १२०० किलोमीटर पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर नमूद करावेत.

(३) क्र. ३ येथील कार **सर्व शनिवारी व रविवारी तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशी आवश्यक असणार नाही,** हे विचारात घेऊन महिन्यातील एकूण १२०० कि.मी. करीता एकूण ठोक रक्कम नमूद करावी. तसेच महिन्यातील १२०० किलोमीटर पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर नमूद करावेत.

उपरोक्त वाहने शासकीय साप्ताहिक सुट्टी अथवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रशासकीय कारणास्तव आवश्यक झाल्यास उपलब्ध करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. त्या दिवसाचा केवळ वाहनचालकाचा अतिकालिन भत्ता देण्यात येईल.

२२. केवळ सर्वात कमी दर नमूद करणा-या वाहनांचा विचार केला जाईल. त्यामुळे वरील विवरणपत्रात नमूद केलेल्या ३ वाहनांसाठी स्वतंत्र-स्वतंत्र एजन्सीचा विचार होऊ शकतो.

२३. वरील अटी व शर्तीचे योग्य प्रकारे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. अन्यथा वरील अ.क्र. १७ नुसार दंडात्मक किंवा इतर कार्यवाही करण्याचा अधिकार कंपनीकडे असेल.

२४. निविदा विहित अर्जाच्या नमुन्यातच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा विहित नमुन्यात नसल्यास अथवा संपूर्ण अपेक्षित तपशिल अर्जात भरलेला नसल्यास निविदा अर्ज रद्द समजण्यात येईल. या निविदेप्रकरणी मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांचा निर्णय अंतिम राहील तसेच तो सर्वांना बंधनकाराक राहील.

२५. वरील विवरणापत्रात नमूद ३ वाहनांसाठी सदरहू निविदा प्रक्रीया राबविण्यात येत असली तरी उपरोक्त ३ वाहने अथवा त्यापेक्षा कमी अथवा एक देखिल वाहन भाडे तत्वावर घेणे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितवर बंधनकारक असणार नाही. ती वाहने प्रत्येक वेळी अथवा कोणत्याही क्षणी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या प्रशासकीय आवश्यकता विचारात घेऊनच भाडे तत्वावर घेण्यात येतील अथवा एक महिन्याची पूर्वसूचना देऊन भाडे तत्वावर घेण्याचे बंद करण्यात येईल. त्याबाबतची पुरवठा कंत्राटदाराची कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोण्त्याही कारणास्तव जादा वाहन आकस्मिकपणे घेण्याची आवश्यकता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितला भासल्यास व सदरहू निविदा प्रक्रीयेतील दरापेक्षा कमी दराने उपलब्ध होत असल्यास ते उपलब्ध करण्यात येईल. त्याबाबतीत कंत्राटदाराचा संबंध असणार नाही.

२६. कोणतीही निविदा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया, कोणतेही कारण न देता, रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

महाव्यवस्थापक (प्रशा),
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

D:\SPPL 17\A.M\Vahane Bhadyane Purvinyakarita Nivida Magvinebabt.docx

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र.** २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९११८९ **फॅक्स:** २६५९०५८६

**ई-मेल:** sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:** www.sppl.biz


## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयास वाहने भाडेतत्वावर ६ महिन्यांकरीता पुरविण्याकरीता ई-निविदा अर्जाचा नमुना

**संदर्भ: क्र. शिपुप्रम/वाहन/निविदा/प्र.क्र.५३/२०१,. दि. ११ ऑक्टोबर, २०१७**

१. निविदा सादर करणाऱ्याचे/संस्थेचे नाव :

२. संपूर्ण पत्ता :

३. दुरध्वनी (कार्यालय) : लॅन्डलाईन : मोबाईल :

फॅक्स :

ई-मेल :

४. आयकर नोंदणी क्र. (पॅन) (स्वयं साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक) :

५. वस्तू व सेवा कर(जीएसटी) नोंदणी (स्वयं साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक) :

प्रमाणपत्र देणारे कार्यालय :

| अ.क्र | अपेक्षित वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहनांची संख्या एकूण ३ | खाली नमूद केल्याप्रमाणे महिन्यातील एकूण किलोमीटर करीता वाहनचालकासह मासिक रक्कम नमूद करणे. | विनिर्दिष्ट किलोमीटर पुढील प्रती किलोमीटरकरीता दर नमूद करणे. | महिन्याच्या ३०० तासानंतरच्या अधिक तासाचा वाहनचालकाचा मोबदला म्हणून अतिकालीक भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | Honda City AC/ INNOVA AC | १ | शासकीय साप्ताहिक सुट्टया व सार्वजनिक **सुट्टयांसह महिन्याचे सर्व दिवशी** तसेच प्रत्येक महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहन उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १८०० किलोमीटर करीता मासिक एकूण ठोक रक्कम नमूद करावी. त्यानुसार दरमहा एकूण ठोक रक्कम रू.......... | महिन्यातील १८०० किमी पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर रु. . . . . .. प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु...... प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| २. | AC इंजिन कॅपेसिटी (Engine Capacity) किमान १२०० CC | १ | शासकीय साप्ताहिक सुट्टया व सार्वजनिक सुट्टया **वगळून** महिन्यातील उर्वरीत दिवस विचारात घेऊन तसेच महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहन उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १२०० कि.मी.करीता मासिक एकूण ठोक रक्कम नमूद करावी. त्यानुसार रु. . . . दरमहा. | महिन्यात १२०० किमी पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी दर - रु. . . . . .. प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु. . . . . प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| ३. | कार AC- इंजिन कॅपेसिटी साधारणपणे (Engine Capacity) ९९८ ते १५०० दरम्यानची. | १ | आठवडयातील **सर्व शनिवार व रविवार तसेच सार्वजनिक सुट्टया वगळून** महिन्यातील उर्वरीत दिवशी व महिन्याचे एकूण ३०० तास सदरहू वाहने उपलब्ध करण्याचे विचारात घेऊन प्रत्येक महिन्याचे १२०० कि.मी. करिता एकूण मासिक ठोक रक्कम नमूद करणे. त्यानुसार महिन्याची एकूण ठोक रक्कम रु................. | १२०० कि.मी. पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी रू........प्रमाणे | महिन्याच्या एकूण ३०० तासानंतरच्या प्रत्येक तासासाठी मोबदला म्हणून रु. . . . . प्रती तास प्रमाणे वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता. |
| | **एकूण** | **३** | | | |

**दिनांक:** / /२०१७

**(शिक्यासहित स्वाक्षरी)**

**सूचना:** १) दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द समजण्यात येतील.

२) ई-निविदा www.mahatenders.gov.in व्दारे सादर करणे आवश्यक. अन्यथा विचार केला जाणार नाही.

C:\Users\SPPL 17\Desktop\Vahane Bhadyane Purvinyakarita Nivida Magvinebabt.docx